# वि. स. खांडेकरांच्या कथात्म साहित्यामध्ये पडलेले गांधी विचारांचे प्रतिबिंब

**प्रो. डॉ.सविता अशोक व्हटकर,** विभाग प्रमुख-मराठी भोगावती महाविद्यालय, कुरुकली.

---

**प्रस्तावना:**

प्रत्येक लेखक आपले साहित्य लिहित असताना सामाजिक प्रश्नांचा विचार मोठ्या प्रमाणात करत असतात. कारण त्यांची वैचारिक नाळ ही कुटुंबांबरोबर प्रथमत: समाजाबरोबर जोडलेली असते. साहजिकच लेखकाला समाजाचा विचार करणे क्रम प्राप्त ठरते. त्यांच्या लेखन प्रक्रियेत, विचारप्रक्रियेत काही दिग्गज व्यक्तिमत्त्वे येतच असतात. वरील निबंधाच्या विषयास अनुसरून 'वि.स. खांडेकरांच्या कथात्म साहित्यामध्ये पडलेले गांधी विचारांचे प्रतिबिंब' कशा प्रकारचे असते. याचा विचार केलेला आहे. वि.स. खांडेकरांच्या साहित्याचा विचार करता मराठी वाङ्मयात वि.स. खांडेकर यांचे अत्यंत महत्वपूर्ण स्थान आहे. सुमारे ४७ वर्षे सर्वांगीण व विपुल लेखन करणारे वि.स. खांडेकर यांनी समिक्षक म्हणूनही भरपूर लेखन केलेले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वावर स्वातंत्र्यपूर्व काळातील ध्येयवादाने भारलेल्या वातावरणाच्या परिणाम होता. टिळकांच्या होमरूळ चळवळीने, गांधींच्या चंपारण्यातील सत्याग्रहाने, जालियनवाला बागेतील हत्याकांडाने त्यांचे मन हेलावून गेले होते. १९४८ साली गांधीजींनी जेव्हा निळीच्या मळयात काम करणाऱ्या मजुरांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी चंपारण्यात सत्याग्रह केला.शिरोडा येथील रेड्डी येथील मिठागरात एप्रिल-मेच्या भाजणाऱ्या उन्हात राबणारी माणसे त्यांनी पाहिलीतेव्हा त्यांच्यासाठी काहीतरी करावे अशी त्यांच्या मनात भावना निर्माण झाली. शिरोड्यात झालेल्या मिठाच्या सत्याग्रहासाठी त्यांनी खूप मदत केली. अज्ञान, दारिद्रय आणि धर्मभोळेपणा या तिन्हींच्या कचाट्यात सापडलेला माणूस जिद्दीने जगण्यासाठी धडपडतोच हे त्यांनी पाहिले होते. याशिवाय गांधीजींच्या विचारणाचा प्रभावही एक लेखक म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर झालेला होता. समाजातील अनेक प्रश्नांची त्यांना जाणीव होती. या सगळ्या पार्श्वभूमीवर वि.स. खांडेकरांच्या लेखन साहित्यावरही गांधीजींच्या विचारांचा प्रभाव आहे. त्यामुळेच गांधीजींच्या विचारांचे प्रतिबिंब वि.स. खांडेकरांच्या साहित्यातून कशा प्रकारे दिसून येते ते मी प्रस्तुत निबंधात मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

वि.स. खांडेकरांच्या कथा-कादंबरीतून आलेल्या प्रसंगाशी वास्तव जीवनातील घटनांचा संबध आहे. त्यांनी शिरोडा येथे १८ वर्षे शिक्षक म्हणून कार्य केले. तेथे त्यांना गांधी विचारांची झालेली ओळख तसेच त्यांच्या विचारांचा पगडा यातूनच 'सागरा अगस्ती आला' ही रूपककथा जन्माला आली. शिरोड्यातील मिठाच्या सत्याग्रहात ते सक्रिय होऊ शकले नाहीत, तरी माऊलीच्या देवळात आणलेल्या जखमीसत्याग्रहींची सेवा करताना या सत्याग्रहींनी प्राणांतिक वेदना हसत मुखांनी सोसलेल्या पाहून त्यांना 'दोनटोक' ही कथा सुचली. या कथेतील तरुण त्यांना या सत्याग्रहातच भेटला होता. 'आंध्र मलमल' ही उपरोधी कथा आणि 'उल्का' या कादंबरीत आलेल्या सत्याग्रहाचा भाग खांडेकरांनी शिरोड्याला झालेल्या मिठाच्या सत्याग्रहातूनच घेतलेला आहे. १९२० हा गांधीजींच्या उदयाचा काळ होता. तेव्हा संपूर्ण देशामध्ये राजकीय, सामाजिक परिवर्तन घेऊ पहात होते. त्यावेळची सामाजिक मते प्रवाहित होती. सामाजिक बदलाची नवनविन स्वप्ने त्यांच्या मनाला आनंद देत होती. नवनव्या क्रांत्यांची व प्रगतीची वाटचाल स्वप्नातून सत्यात उतरावी. यासाठी बराचसा वर्ग पुढे सरकत होता. विशेषत: सामाजिक परिस्थितीची जाणीव असणारे लेखक, कलावंत साहित्यातून आपापले विचार मांडतच होते.

शिरोड्याला शिक्षक म्हणून आल्यावर तिथले समाज जीवन पाहून भारतातील खेडेगावातील सामाजिक जीवन कशा प्रकारचे आहे. याची त्यांना जाणीव घेऊ लागली होती. गांधीयुगा दरम्यान खांडेकरांचे लेखनकार्यही सुरु होते होते. महात्मा गांधीची चळवळही प्रभावी ठरत होती. साहजिकच खांडेकरांना राजकीय वातावरण आजूबाजूला पहायला मिळत होते. आर्थिक प्रश्नांच्या बाबतीत समाजातील गरीब-श्रीमंत हा भेदभाव त्यांना ज्ञात होता. संस्कृतीच्या बाबतीत ती कालानुरूप बदलत राहते. दर एक पिढीने 'त्या' संस्कृतीकडे डोळसपणे पहावे. त्यातील जीवनोपयोगी स्वीकारावे बाकी उर्वरिताला चांगले रूप देण्याचा प्रयत्न करावा नकाराच्या बाबतीत असे का? या

प्रश्नाचे उत्तर शोधणे त्यावर मनन चिंतन करणे. या प्रक्रियेत वि.स. खांडेकरांनी आपल्या साहित्य लेखनात गांधीजींच्या विचारधारेला महत्त्व दिलेले आहे.

शिक्षक म्हणून कार्य करत असताना शिरोड्यातील सभोवतालचे लोकजीवन खांडेकरांनी पाहिलेले होते. तिथल्या समाजाच्या रूढी, रिती, परंपरा त्यांनी जवळून पाहिल्या तिथली समाजजीवन पद्धती न्याहाळली शिरोडे या गावी त्यांच्यावर साहित्यिक संस्कार झाला. त्याला त्यांनी आपल्या साहित्य निर्मितीची प्रेरणा मानली आणि ते आपले लेखन करू लागले. 'माझ्या जीवनावर व लेखनावर परिणाम घडून आणणारे 'ग्रंथ' या आपल्या समीक्षा लेखात 'ज्याने माझ्या आयुष्यावर परिणाम केला असे एकच पुस्तक आहे. त्या पुस्तकाचे नाव शिरोडे'[१] असे ते सांगतात. लेखननिर्मिती मागेत्यांची श्रद्धा होतीच. आपले जीवन आणि समाजव्यवस्था यामध्ये दोष आहे. पण ही जाणीव समाज मनाला लवकर समजत नाही. कारण परंपरेनुसार चालत आलेली रुढींची चौकट मोडण्याचे धाडस करणार कोण? याशिवाय भौतिक सुख मिळवून देणारे विज्ञानाच्या विरोधात बुद्धिवाद जातो का? समाज परिस्थितीत बदल होत राहतो. घातक रूढी विरोधात बंड करून नव्याचे स्वागत खरी काळाची गरज आहे. यासारख्या प्रश्नाची उकल करताना वि. स. खांडेकरांच्या साहित्यात गांधीजींच्या विचारांचे प्रतिबिंब दिसून येते.

गांधी युगामध्ये भारतात राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक घडामोडी झाल्या त्याचा परिणाम सामाजिक जीवनाबरोबरच कौटुंबिक जीवनावरही झाला. 'सत्य हाच परमेश्वर असून अहिंसेने त्याचा शोध लावणे शक्य आहे असा गांधीजींचा सिद्धांत होता. भारतातील समाजसुधारणा ही धर्मसुधारणेवरती अवलंबून आहे. याचे कारण धार्मिकतेचे अधिष्ठान समाजव्यवस्थेला आहे. आपल्याच बांधवांसाठी हिंदू आणि मुस्लीम दोन्ही धर्माचे लोक प्रयत्न करत होते. ही महात्मा गांधींनी दिलेली हाक होती. त्यातील सर्व लोकांमध्ये त्यांनी स्फूर्ती निर्माण केली होती. तरीही राष्ट्रीय ऐक्यासाठी त्यांना झगडावे लागले.

साधी राहणी, श्रम, खेड्यांचा उद्धार, जातीभेदाला विरोध या गोष्टींवर गांधीजींचा भर होता. भेदभाव कमी करण्याचा प्रयत्न त्यांनी समाजातील वेगवेगळ्या स्तरातूनही केला. जसे त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत स्वत:ला झोकून दिले. व तसे त्यांनी देशाला विधायक कार्यक्रमही दिले. गांधीजींचे स्वराज्याच्या बाबतीत असणारे विचार गो. म. कुलकर्णी पुढील शब्दात मांडतात. 'आत्मनिष्ठा, आत्मशुद्धी, आत्मबोध, आत्मराज्य यांना अग्रस्थान देतात. त्यांचा आत्मबोध आत्मकेंद्रीत नसून तो समाज सापेक्ष आहे. सर्वोदय हे त्यांचे साध्य आहे.'[२]दुसऱ्या महायुद्धानंतर संपूर्ण मानवजातीला भीषण वास्तवाला सामोरे जावे लागले. व्यक्ति आणि समाज या दोहोंची मते स्थिरस्थावर करण्याचा प्रयत्न म्हणून त्यांना योग्य तो मार्ग व चिंतनाची, विचारांची दिशा गांधीजींच्या अनुकरणातून दाखविणे गरजेचे झाले होते. वाङ्मयाच्या कलेतून वि. स. खांडेकरांनी ही जबाबदारी स्वीकारलेली होती. दरम्यान भारतीय राजकारणामध्ये गांधी तत्त्वाचा प्रभाव जाणवू लागला होता. असे असले तरी महात्मा गांधीजींच्या तत्वाला अध्यात्माची जोड होती. स्वत: गांधीजींच्या अंत:प्रेरणेवरती विश्वास होता. क्रांतिसाठी अहिंसा त्यांना कधीच मान्य नव्हती. धर्म म्हणजेच प्रेम व समाजाची सेवा आणि ध्येय म्हणजेच सत्य हे गांधीजींचे तत्त्वज्ञान. भारतीयांच्या मनामनात भरले. १९२६ पासून महात्मा गांधींच्या सामाजिक चळवळीस जोर भरला. त्यांनी सामान्य जनतेला राजकारणात सहभागी करून घेतले. अस्पृश्यता हा हिंदू धर्माला लागलेला कलंक आहे असे ते समजत. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या प्रयत्नाबरोबरच त्यांनी शिक्षणाचे महत्त्व, स्त्रियांना त्यांचे हक्क, अधिकार मिळवून देण्यासाठीचे प्रयत्न केला.

वि. स. खांडेकरांच्या कथात्म सामाजिक चित्रण हे समाज बदलाच्या विचार करणारे आहे. समाजकार्यासाठी आवश्यक असणारी श्रद्धा असल्याशिवाय मानवी मुल्यांचा विकास होणार नाही. समाजातील प्रमुख घटक हा व्यक्ति आहे. त्यांच्या जीवनातील न्याय-अन्याय, गरीब-श्रीमंत, चांगले-वाईट, खरे-खोटे यासारख्या द्वंद्वाची टोचणी सोबत घेऊनच समाजातील वास्तव घटकांबरोबर त्यांनी आदर्श राखण्याचाही प्रयत्न केलेला आहे. म्हणजे 'सामाजिक जीवनाविषयीचा कळवळा आणि अस्पृश्य-गरीब-श्रमिकांबद्दलची आपुलकी हा खांडेकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि पर्यायाने त्यांच्या लेखनाचाही स्थायीभाव आहे. त्याच्यामधील समाजमनस्क तत्त्वचिंतक सदैव जागा असल्याने त्यांच्या लेखनात अनुभूतीच्या कलात्मक आविष्काराची जागा वैचारिकतेने अधिक घेतली.'[३]

मानवी जीवनाविषयीचे चिंतन करताना त्यांना अस्पृश्य व स्त्रिया यांच्याही प्रश्नांना प्राधान्य दिलेले आहे. एकंदरीत त्यांनी एकूण समाजातील अनेक गंभीर प्रकारचे प्रश्न हाताळलेले आहेत.

वि. स. खांडेकरांचेबरेच कथात्म साहित्य राजकीय प्रश्नांची दखल घेणारे आहे. हे कथात्म साहित्यस्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील आहे. ब्रिटीशांच्या विरोधात सरकारी नोकरी करणाऱ्याला उघड-उघड विरोध करता येत नाही. तेव्हा अप्रत्यक्ष चळवळीत सहभागी होऊन सत्याग्रहींना शक्य होईल तितकी मदत करणे. याचे त्यांना आपण भारतीय स्वातंत्र्यासाठी काहीतरी करतो आहोत या विषयीचे त्यांना समाधान ही वाटते. गांधीजींच्या विचारांचा प्रभाव खेडोपाडी पोहोचला तो फक्त जाणकारांपुरताचमर्यादित राहिला नाही. तर तो विद्यार्थी दशेतील मुलांपर्यंत पोहोचला. तो त्यांच्या मनातील स्वदेशीची जाणीव निर्माण करण्यात यशस्वी ठरला.

वि. स. खांडेकरांच्या कथात्म साहित्यातून येणारा सामाजिक, राजकीय विचार प्रभावी होत होता. तसेच त्यांची जीवनाविषयी असणारी अहिंसा व सत्य तत्त्वेही प्रभावी ठरलेली होती. अशा प्रकारे राजकीय व सामाजिक विचारातूनही गांधीवादी विचारसरणीचे पडसाद सामाजिक स्तरावरून खांडेकरांनी अचूक वेचले व त्याचा उपयोग त्यांनी आपल्या साहित्य लेखनातून प्रतिबिंब केला.

**सांराश :**

वि. स. खांडेकरांनी मानवी जीवनातील विविध प्रश्नांकडे ते डोळसपणे पाहतात. समाजातील राजकारणातील विविधांगी प्रश्नांचा विचार करताना त्यांनी महात्मा गांधींच्या विचारसरणीचा आधार घेतलेला आहे. जीवनातील विविध समस्या मध्यमवर्गीयांची ध्येयवादी परिस्थितीने होणारी परवड आणि समाजातील दांभिकता यांचेकडे लक्ष वेधले गेले. तत्कालीन गांधीवादाचा प्रभाव त्यांच्या विचारसरणीवर होता. त्याद्वारे राष्ट्रवाद, साधेपणा त्यांचा स्वदेशीचा आग्रह, त्यांच्या ज्ञानाची देशाला असणारी गरज त्यांनी जीवनभर जपलेली मानवी मूल्ये आज पायदळी तुडवली जात आहेत. अशी खंतही वि. स. खांडेकरांनी कथात्म साहित्यातून मांडलेली आहे. या परिषदेच्या निमित्ताने पुन्हा नव्याने गांधीजींच्या विचारांचा जागर होण्याची गरज आहे असे मला सांगावेसे वाटते.

**संदर्भ :**

१) वि. स. खांडेकर – 'फुले आणि काटे', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, ३०, व्दितीय आवृत्ती, १९९६, पृ. १८.

२) पुंडे दत्तात्रय(संपा.)- 'गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९५, पृ. २४.

३) वि. स. खांडेकर- 'गाभारा', अनमोल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९७८, पृ. १३१.